जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल
cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र 9819208279

प्रेस नोट दिनांक– १६/०७/२०२६

मुंब्रा परिसरात अनोळखी मयत इसमाचा धडापासून मुंडके वेगळे करून, ओळख पटू नये म्हणून प्रेत निर्जन स्थळी टाकून अज्ञात आरोपीतांन केलेली हत्या गुन्हे शाखा घटक –४, उल्हासनगरकडून उघडकीस

गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर येथील पोलीस निरीक्षक राजेश गज्जल यांना गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळाली की, मुंब्रा पोलीस ठाण्याचे हद्दीत खड्डी गाव याठिकाणी काही इसमांनी जुन्या वादाचे कारणातून एका इसमाचे मुंडके धडापासून वेगळे करून, दोन्ही हात तोडून, सदर प्रेत निर्जन स्थळी टाकून खून केला आहे. नमूद बातमी बाबत मा. वरिष्ठांना माहिती दिल्यानंतर मा. वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली सदर बातमीची खात्री करून, गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर कडील अधिकारी व अंमलदार यांनी इसम नामे **१) फैज सुलतान मालीम वय २४ वर्ष धंदा – रिक्षा चालक रा. रूम नं. ११०१, म्हाडा बिल्डींग नं. ०३ भंडार्ली उत्तरशिव, शिळ डायघर, ठाणे, २) अल्बान सुलतान मालीम वय २३ वर्ष धंदा – रिक्षा चालक रा. रूम नं. ११०१, म्हाडा बिल्डींग नं. ०३ भंडार्ली उत्तरशिव, शिळ डायघर, ठाणे** यांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेवून त्याचेकडे मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सखोल विचारपूस केली असता वर नमूद आरोपीत यांनी त्यांचा मित्र मयत इसम नामे **अमन मुस्तकीन शेख वय अंदाजे २३ वर्ष रा. रशिद कंम्पाऊंड श्रीलंका, देवरीपाडा,** मुंबा, यास दि. १३/०३/२०२६ रोजी झालेल्या वादावरून त्याचा खुन केल्याची माहिती दिली.

सदर आरोपीत यांनी दि. १३/०३/२०२६ रोजी रात्रौ ०९:०० वा. सुमारास यास मयत यास श्रीलंका एरिया, मुंब्रा या परिसरातून रात्रीच्या वेळी सोबत घेवून रिक्षा मध्ये त्यास निर्जन ठिकाणी नेवून त्याचा धारधार चाकूने गळा चिरून जिवेठार मारून मयताची ओळख पटू नये म्हणून प्रेताचे मुंडके धडापासून वेगळे करून खर्डीगाव येथे टाकून, दोन्ही हात कापून, उर्वरीत प्रेताचे भाग निर्जन स्थळी टाकून दिले. सदर मयत यास जिवेठार मारताना आरोपीत यांनी त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडीओ शुटींग केली आहे. सदरचा मोबाईल पुराव्याकामी पोलीसांनी जप्त केलेला आहे.

सदर बाबत मुंब्रा पोलीस ठाणे येथे खात्री केली असता, मुंब्रा पो.ठाणे अकस्मात मृत्यू रजि.नं. ११४/२०२६ बी.एन.एन.एस.१९४ मध्ये वैद्यकीय अधिका—यांच्या अहवालावरून सदर अकस्मात मृत्यूवरून मुंब्रा पो.ठाणे येथे गु.र.नं. ११९३/२०२६ भा.न्या.सं. १०३ (१),२३८ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अशा प्रकारे गंभीर स्वरूपाचा गुन्हा व मयत इसमाची ओळख पटू नये याकरीता केलेल्या क्रर हत्येचा कट, गुन्हे शाखा, घटक —४, उल्हासनगर यांना पुराव्याचे कामी कोणतीही माहिती नसताना, तो अंत्यत उत्कृष्टपणाने पुर्णपणे उघडकीस आणला.

यातील अटक आरोपी फैज सुलतान मालीम याचेवर यापुर्वी देखील १) मुंब्रा पोलीस ठाणे गु.र.नं. १४५१/२०२४ भा.द.वि.क. ३६३,३०२,२०१, २) मुंब्रा पो.ठाणे गु. र.ने. ११०७/२०२१ भा.द.वि.क. ३२४,३२३,५०४,५०६ (२),३४ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस सह आयूक्त सो, (गुन्हे), ,श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त, (शोध—१) यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक/राजेश गज्जल, सपोनि/श्रीरंग गोसावी, पोलीस हवालदार/३२१६ गणेश गावडे, पोलीस हवालदार/६६६३ राजेंद्र थोरवे, पोलीस हवालदार/४५२२ मंगेश जाधव, पोलीस हवालदार/३८२६ योगेश वाघ, पोहवा/६६८५ अशोक थोरवे, पोहवा/३१७७ प्रकाश पाटील, पोहवा/११२५ रितेश वंजारी, पोहवा/१४०३ सतिश सपकाळे, पोहवा/१०७५ शेखर भावेकर, पोहवा/३७ विक्रम जाधव, पोना/संजय शेरमाळे, पोशि/७२०१ प्रसाद तोंडलीकर, पोशि/७७०२ बाबुलाल जाधव, असे पोलीस पथकाने केली आहे.